FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154159

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे एसीबी Police Station, पहिली खबर क्र. 09 FIR No, वर्ष 2023 Year, दिनांक 06/9/2023 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून 6/9/2023 वेळ ........, तारीख पर्यंत 6/9/2023 वेळ 16.35 वा.
   Occurrence of offence Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 6/9/2023 ........ वेळ ........
   Information received at P. S. Date, Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 02 ........ तारीख 6/09/23 वेळ 6:35
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 25 किमी, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय कामगार भवन, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ई ब्लॉक, रस्त्याचे नाव बी.के.सी.
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव सुरेश प्रभाकर शर्मा Name
   (b) वडिलांचे / पतीचे नाव प्रभाकर शर्मा Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय 52 वर्षे Date of Birth and Age
   (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality, फोन नं. ........ Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ........ Passport No., दिल्याचा दिनांक ........ Date of Issue, दिल्याचे ठिकाण ........ Place of Issue, (f) व्यवसाय कामगार Occupation
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता प्लॉट ........ Ward, गल्ली / सर्व्हे नं. ........, घर / नाव नं. ........ सेक्टर-2 House/Name No., फोन / मो. 9969687242 Phone/Mo. No., पॅन नं. ........ PAN No., वोटर्स न. ........ Card No.
   Address :
   रस्त्याचे नाव ........ Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ Nearest identifiable place, गाव ........ Village, पोस्ट ........ Post, पो. स्टे. ........ P. Stn.
   तालुका नवी मुंबई Taluka, जिल्हा ठाणे Dist., राज्य महाराष्ट्र State, सध्याचा पत्ता वरीलप्रमाणे Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   1) आनंद बनाजी भोसले, वय 40 वर्षे, पद- सहाय्यक कामगार आयुक्त तथा उपनिबंधक श्रमिक संघ अधिनियम 1926, कोकण विभाग, मुंबई अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय कामगार भवन, बीकेसी, मुंबई रा. ठी. 702, आर्वेन गार्डनिया, सेक्टर-20 कळंबोली, नवी मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

   2) नानाजी ज्ञानबा साळुंखे, वय 48 वर्षे पद- वरिष्ठ लिपीक कार्यालय - वरीलप्रमाणे, रा. ठी. शासकीय वसाहत, ब/208, रूम न. 3, बांद्रा (पुर्व), मुंबई-51

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ नाही ............

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी यांनी श्री.गणेश मुर्तीकार कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्र मिळणेकरीता अपर कामगार आयुक्त, कामगार भवन, बी.के.सी. येथे अर्ज सादर केला होता. आलोसे भोसले व साळुंखे यांनी सदर नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरीता २५,०००/- रुपयाची मागणी केली. तडजोडीअंती आलोसे आनंद भोसले यांनी १५०००/- व आलोसे नानाजी साळुंखे यांनी ५०००/- रुपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक प्रविण जगोसावी

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... — ......, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. .................................................. District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रविण जगोसावी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ............

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner

जबाब                                    दिनांक :– ०७/०१/२०२१

श्री. सुरेश प्रभाकर शर्मा, वय ५२ वर्षे, धंदा – कमर्शिअल आर्टीस्ट, राठि – एफ टाईप
सोसायटी,एफ २/०२, घणसोली सेक्टर ९, घरोंदा, नवी मुंबई – मो.क्र. ९९६९९६८७२४२

................

मी वरीलप्रमाणे असून नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियांसह रहावयास आहे. मी कमर्शिअल आर्टीस्ट
असून त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीतो.

मी व माझ्या कला क्षेत्राशी निगडीत सहकाऱ्यांनी सन २०१९ मध्ये मूर्तिकलेशी निगडीत कामगारांची
संघटना स्थापन करण्याचे ठरविले होते. त्यानुसार बैठक होऊन आमच्या सर्व सहकाऱ्यांनी कमीटी स्थापन
केली असुन, त्यामध्ये माझी सरचिटणीस म्हणून, वसंत राजे यांची संस्थापक सदस्य म्हणुन आणि राहुल
घोणे यांची खजीनदार म्हणुन निवड करण्यात आली आहे. वरील संघटनेच्या नोंदणी करीता लागणारी सर्व
कागदपत्रे '' अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, रिझर्व बँकच्या
मागे, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई – ५१'' या कार्यालयात सादर करून, संघटनेचे रजिस्ट्रेशन
करण्याकरीता कमिटीतर्फे मला, वंसत राजे, राहुल घोणे यांना सांगण्यात आले आहे.

त्यानुसार डिसेंबर महिन्याच्या सुरूवातीला मी व माझे सहकारी राहुल घोणे, अपर कामगार आयुक्त,
कोकण विभाग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई येथे गेलो तेथे आम्ही तानाजी सांळुखे या साहेबांना भेटलो.
आम्ही संघटना स्थापन करून रजिस्टर करीत असल्याचे आमचे म्हणणे त्यांनी ऐकुन घेतले व आम्हाला
त्याकरीता लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती देऊन व्यवस्थीत फाईल बनवून घेऊन येण्यास सांगितले.

श्री. तानाजी सांळुखे यांच्या सांगण्याप्रमाणे कागदपत्रांची व्यवस्थीत फाईल तयार करून माझे
सहकारी राहुल घोणे यांच्यासह मी त्यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी त्यांनी अणुक्रमणीका
लिहून, तसेच डिक्लेरेशन आणि संघटनेच्या घटनेची नियमावली ग्रीन पेपरवर लिहून आणण्यास सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक ३०/१२/२०२० रोजी सर्व कागदपत्राची पुर्तता करून मी एकटयानेच श्री.
तानाजी साळुंखे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली असता चहापिण्याच्या निमित्ताने ते माझ्या
सोबत कार्यालयाबाहेरील चाहाच्या टपरीवर आले. चहा पित असताना सांळुखे साहेबानी मला सांगितले की,
त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. भोसले साहेब हे पहिल्या माळयावर बसतात त्यांना भेटून घ्या. त्याप्रमाणे आम्ही
पहिल्या माळयावर जाऊन श्री. भोसले, साहेबांची भेट घेऊन आम्हाला मूर्तिकलेशी निगडीत कामगारांची ''
श्री गणेश मूर्तिकार कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) '' या नावाने संघटना रजिस्टर करावयाची असल्याचे
सांगितले. तेव्हा त्यांनी मला ठिक आहे. तुम्ही साळुंखे साहेबाना भेटा ते तुमचे काम करतील व त्यांना मी
वर बोलावले आहे असा निरोप द्या, असे सांगीतले. त्याप्रमाणे मी तळमजल्यावर जाऊन सांळुखे साहेबांची
त्यांच्या केबीन मध्ये भेट घेऊन श्री. भोसले साहेबांनी त्यांच्या कार्यालयात बोलावले असल्याचा निरोप दिला
तेव्हा लागलीच श्री सांळुखे साहेब वरच्या मजल्यावर निघून गेले, व जाताना त्यांनी मला बसायला सांगितले.
थोडया वेळातच श्री. सांळुखे साहेब त्याच्या कार्यालयात परत आले व त्यांनी मला सांगितले की, भोसले
साहेबांनी तुमच्या संघटनेचे रजिस्ट्रेशनचे काम करण्याकरीता रु २५,०००/– सांगितले आहेत. सदरवेळी मी
त्यांना सदरची रक्कम कसली आहे ? कायदेशीर फी ची आहे काय ? याबाबत विचारणा केली. तसेच
आम्ही गरीब मूर्तिकार एवढी रक्कम कुठुन आणणार असे सांगितले असता तुम्ही याबाबत भोसले साहेबांशी
बोला असे त्यांनी मला सागिंतले.

त्यामुळे मी लागलीच पहिल्या माळयावर जाऊन भोसले साहेबाची भेट घेतली व त्यांना विचारले
की, साहेब एवढी रक्कम कसली ? कायदेशीर फी एवढी आहे काय ? आम्ही इतर संघटनांचा पाठींबा
घेवून हे कार्य करीत आहोत. त्यावर भोसले साहेबानी मला सांगितले की, बाकीच्या गोष्टी काही सांगू नका,
तुम्ही पैसे देणार की नाही तेवढेच सांगा व निघा असे म्हणाले. तेव्हा माझा नाईलाज झाल्याने मी काही एक
न बोलता सांळुखे साहेबाच्या कार्यालयात त्यांना भेटलो व भोसले साहेब मागणी करतात त्याप्रमाणे रू
२५,०००/– देणे शक्य नाही असे सांगितले व मी काय करायचे ते सांगा असे बोललो. तेव्हा सांळुखे
साहेबांनी माझ्याकडील संघटनेच्या रजिस्ट्रेशन करीता तयार केलेली फाईल स्वीकारून, स्वाक्षरी करून त्यांची
पोच देऊन तुम्ही बुधवारी दिनांक ०६/०१/२०२१ रोजी या आपण काहीतरी मार्ग काढू असे सांगितले.

7/1/21

Scanned with CamScanner

परंतु मला लोकसेवक भोसले व साळुंखे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने, मी व माझे संघटनेचे सहकारी वसंत राजे असे दोघे दिनांक ०६/०१/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन स.पो.आ. मुगुटराव आणि पो.नि. प्रविण बनगोसावी यांचेकडे दोन शासकीय पंचा समक्ष लोकसेवक विरुध्द स्व:हस्ताक्षरात तक्रार केली. पो.नि. प्रविण बनगोसावी यांनी माझी लेखी तक्रार घेवुन लागलीच पडताळणी व सापळा कारवाई करण्यात येईल सांगितले.

पो.नि बनगोसावी हे आम्हाला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे हजर पोलीस कर्मचारी याचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. बनगोसावी, यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले.

सदर पडताळणी व सापळा कारवाईत सहभागी होणारे अधिकारी व अंमलदार यांची आमच्या सोबत ओळख करून देवुन, स.पो.आ. मुगुटराव व पो.नि. बनगोसावी यांनी पडताळणी व सापळापुर्व कारवाई बाबतच्या योग्यत्या सुचना आम्हा सर्वांना दिल्या. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. ५,०००/– ( भारतीय चलनातील रु. १००/– च्या ५० नोटा ) पो.नि. बनगोसावी यांचेकडे दिले. तसेच उर्वरित रक्कम आमच्याकडे नसल्याने कमी पडणारी रक्कम खेळण्यातील (टॉय करन्सी ) वापरणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी, माझे संघटनेचे सहकारी वसंत राजे, पंच व पोलीस पथकासह शासकीय वाहनांनी अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई – ५१ येथे रवाना झालो. तेथे कार्यालयाचे परीसरात शासकीय जीप थाबविल्या. त्यानंतर मी, माझे सहकारी वसंत राजे व पंच श्री. गडकरी असे अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई – ५१ येथे १२.५२ वा पडताळणी कामी गेलो. सदर ठिकाणी आम्ही श्री. सांळुखे साहेबांना भेटलो असता त्यांनी मला भोसले साहेबाना भेटायला सांगितले. त्याप्रमाणे मी पहिल्या माळयावर जाऊन भोसले साहेबांना भेटायला त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो त्यावेळी त्यांच्या कार्यालयात कोणीतरी बसले होते. त्यांनी मला विचारले की काय काम आहे ? मुर्तीकार संघटना ना.... त्यावेळी मी हो म्हणालो. त्यावेळी ते बोलले की, पाच मिनिट थांबा. त्यामुळे आम्ही त्यांच्या कार्यालयाच्या जवळच थांबून राहिलो. सदरवेळी भोसले साहेबाना भेटण्याकरीता इतर काही संघटनेचे लोक आले होते. त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणात गोंधळ चालू झाला. गोंधळ खुप वाढल्याने स्थानिक पोलीसांना बोलविण्यात आले. पोलीस आल्यांनतर त्यांनी सर्वाना शांत केले त्यानंतर ते सर्व निघून गेले. त्यानंतर भोसले साहेबाना सारखे लोक भेटायला येत असल्यामुळे व आम्हाला त्यांना भेटायला जाता येत नसल्याने आम्ही त्यांच्या कार्यालयाजवळच बसून होतो. त्यानंतर पो.नि. बनगोसावी साहेबानी, मला, माझ्या सोबत असलेला माझा मित्र वसंत राजे याच्याद्वारे संदेश दिला की, भरपूर वेळ झाल्यामुळे व्हाईस रेकॉर्डरच्या सेलची पॉवर संपण्याची शक्यता आहे, तरी तुम्ही कार्यालयाबाहेर या. त्यामुळे आम्ही सर्व कार्यालया बाहेर येवून शासकीय वाहन थाबले होते त्याठिकाणी आलो.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील सेल बदली करून १५.४१ वाजता पुन्हा लोकसेवक भोसले यांना भेटण्यासाठी गेलो साधारण १७.२० वाजे सुमारास मी पुन्हा भोसले साहेबाच्या केबीनमध्ये भेटायला गेलो त्यावेळी भोसले साहेबांनी माझ्या सोबत असलेले वसंत राजे व पंच श्री. गडकरी यांना तुमच काय आहे? अशी विचारणा करून त्यांना बाहेर थाबंण्यास सांगितले. ते दोघ बाहेर गेल्यानंतर मी भोसले साहेबां बरोबर संघटनेच्या रजिस्ट्रेशनच्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा त्यांनी, तानाजीला भेटा...., तुम्ही करा तमच्या हिशोबाने मी बोलतो फोनवर...,असे म्हणुन मला तानाजी साळुखे यांच्याकडे पाठविले. त्यामुळे आम्ही तिघेही लगेच सांळुखे साहेबाना भेटायला तळमजल्यावर गेलो. त्या वेळी सांळुखे साहेबानी हातावर २५ लीहून मला दाखविले. तेव्हा मी रू. २५,०००/– ... काय तरी असे म्हणालो असता साळुखे यांनी तुम्ही जावुन साहेबाशी बोलून या असे म्हणाले. त्यामुळे मी एकटाच पुन्हा भोसले साहेबाना भेटायला त्यांच्या केबीनमध्ये गेलो. त्यावेळी मी भोसले साहेबांना, आम्ही गरीब मूर्तीकार आहोत... काय करायच तुम्हीच सांगा... असे म्हणालो. तेव्हा भोसले साहेब मला म्हणाले की, तुम्ही काय देणार...पंधरा द्या...तेव्हा मी त्याना रूपये पंधरा हजार रूपये असे बोलून, साळुखे साहेबांचे काय? अशी विचारणा केली तेव्हा त्यांनी मी त्याचेशी बोलतो...ठिक आहे बघु या....एक करा तानाजीच काहीं तरी करून टाका...असे म्हणाले. त्यानंतर मी पुन्हा साळुंखेना भेटायला त्यांचे केबीनमध्ये गेलो व त्यांना सांगीतले की, साहेब म्हणाले साळुंखे साहेबांना सगळ सांगीतले आहे... तेव्हा साळुंखे साहेबांनी मला कागदावर १५,००० लिहून दाखविले... तेव्हा मी पंधरा हजार असे म्हणुन त्यात सर्वच काम होणार ना...असे विचारले तेव्हा साळुंखे साहेब म्हणले की,

[signature] 7/1/21

Scanned with CamScanner

जावा ओ मी इथे आहे...नाही आम्हाला केले तर आम्हाला फरक पडत नाही... साळुंखे साहेबांना मी कोणाकडे द्यायच.. असे विचारता साळुंखे साहेबांनी मला त्यांच्याकडे देवून आला तरी चालेल असे म्हणाले. .. त्यानंतर मी पुन्हा माझ्या सोबत असलेले वसंत राजे व पंच गडकरी यांचेसह शासकीय वाहन थावंले होते तेथे आलो.

बनगोसावी साहेब, मुगुटराव साहेब व पंचानी माझे व लोकसेवक भोसले, सांळुखे यांच्या दरम्यान झालेले संभाषण शासकीय वाहनात ऐकले व त्यामध्ये लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्याने तात्काळ सापळा कारवाई आयोजित करणार असल्याचे सांगितले.तसेच तक्रारदार शर्मा यांच्या पेहरावाची पंचाच्या मार्फतीन पाहनी केली लाचेकरीता वापरण्यात येणाऱ्या नोटांचे क्रमांक पंचासमक्ष लिहुन घेण्यात आले तक्रारदार शर्मा व पंचाना अंथ्रसीन पावडरच्या गुणधर्माची माहीती दिली.तसेच तक्रारदार,पंच व सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या सुचना दिल्या.सदरवेळी शासकीय वाहन चालकाने रू. १०० दराच्या ३० नोटा आणि रू. १०० दराच्या टॉय करन्सीच्या १२० नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावून, सदरची रक्कम भासले यांना देण्याकरीता माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवली. तसेच शासकीय वाहन चालकाने रू. १०० दराच्या २० नोटा आणि रू. १०० दराच्या टॉय करन्सीच्या ३० नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावून, सदरची रक्कम साळुंखे यांना देण्याकरीता माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या वरच्या खीशात ठेवली. त्यानंतर मला सुचना दिली की, लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लोकसेवकाच्या कार्यालया समोर पायरीवर येवून '' तोडाला लावण्यात आलेला मास्क पूर्ण काढून मुख्य गेटकडे तोड करून उजवा हात वर करून'' इशारा करावा. सापळा पथक अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई कार्यालयाच्या मख्य प्रवेशव्दारा बाहेर उभे राहणार आहे. त्यामुळे सदर रक्कम घेऊन मी तात्काळ भोसले व सांळुखे साहेबाना भेटायला त्यांच्या कार्यालयात गेलो. भोसले साहेब पहिल्या मजल्यावरील तोटावार साहेबाच्या कार्यालयात उभे होते. मी त्यांच्याकडे पाहून त्यांना '' देऊ '' असे विचारले. तेव्हा त्यांनी होकारार्थी मान हलवून मला इशारा केला म्हणुन मी त्यांना लाचेची रू. १५,०००/– ची रक्कम माझ्या पॅटच्या समोरील उजव्या खिशातुन काढून दिली ( त्यामध्ये रू. १०० दराच्या नोटांचे रू. ३,०००/– व बाकी सर्व रू. १०० दराच्या टॉय करन्सीचे रू. १२,०००/– ). तेथुन मी खालच्या माळयावर सांळुखे साहेबांना भेटायला गेलो. तेव्हा साळुंखे साहेबानी आमचे संघटनेचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट वंसत राजे यांना दिले. तेथे मी त्यांना माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील रू. ५,०००/– ची रक्कम दिली ( त्यामध्ये रू. १०० दराच्या नोटांचे रू. २,०००/– व बाकी सर्व रू. १०० दराच्या टॉय करन्सीचे रू. ३,०००/– ). व लागलीच कार्यालया समोर पायरीवर येवून तोडाला लावण्यात आलेला मास्क पूर्ण काढून मुख्य गेटकडे तोंड करून उजवा हात वर करून पुर्वनियोजीत इशारा केला. तात्काळ सापळा पथकाने कार्यालयात धाड टाकून तानाजी साळुखे व भोसले यांना रंगेहात पकडले. त्यावेळी १८.३५ वाजले होते. तसेच तानाजी साळुखे याचे कडुन त्यांनी लाच म्हणुन स्विकारलेले रू. ५,०००/– आणि भोसले यांच्या कडुन त्यांनी लाच म्हणुन स्विकारलेले रू. १५,०००/– हस्तगत केले.

तरी आम्ही स्थापन केलेल्या '' श्री गणेश मूर्तिकार कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) '' या संघटनेचे रजिस्ट्रेशन करण्या करीता लोकसेवक आनंद धनाजी भोसले, सहाय्यक कामगार आयुक्त, व लोकसेवक तानाजी ज्ञानेबा सांळुखे, वरिष्ठ लिपीक नेमणुक अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग कार्यालय, वांद्रे (पू), मुंबई – ५१ यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वता:च्या फायद्याकरीता पारितोषण म्हणुन अनुक्रमे १५,०००/–रूपये व ५,०००/–रूपयांच्या लाचेच्या रकमेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे. ,

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( प्रविण बनगोसावी )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

7|1|21

Scanned with CamScanner

यासीस फिर्यादी श्री. सुरेश प्रभाकर शर्मा रा. ठी. ७५ टाईप, सेक्टर-८, रूम नं. ७५/२/०२, नवी मुंबई यांच्या स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हेच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष.

(signature)

(प्रविण बनगोसावी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature)

(सुरेश प्रभाकर शर्मा)

Scanned with CamScanner